आजच्या आज वाटणे

पुणे महानगरपालिका

शहर सुधारणा समिती.

कार्यपत्रिका क्रमांक १

मुं.प्रां.मनपा (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम २(२) अन्वये मा.महापौर यांचे आज्ञेनुसार **शहर सुधारणा समितीची विशेष सभा सोमवार दि. १६/४/२००७ रोजी दुपारी १२:१५ (सव्वा बारा)** वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात ) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्रं.१**

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३० (३) अन्वये शहर सुधारणा समितीचे अध्यक्ष पदासाठी निवड करणे.

**विषय क्रं.२**

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३०(३) अन्वये शहर सुधारणा समितीचे उपाध्यक्षपदी नेमणूक करणे.

**विषय क्रं.३**

शहर सुधारणा समिती सभेचा दिवस व वेळ निश्चित करणे.

मा.महापौर यांचे आज्ञेवरुन

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका

**(टीप :- महाराष्ट्र शासनाचा दि.१७ फेब्रुवारी २००७ रोजीच्या अधिसुचनेनुसार मा.अध्यक्ष, स्थायी समिती यांची निवडणूक ज्या पध्दतीने झाली त्याच पध्दतीने निवडणूक होणार आहे.यांची नोंद घ्यावी.)**

**पुणे महानगरपालिका**
**शहर सुधारणा समिती**
**<u>कार्यपत्रिका क्रं. २</u>**

**शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. २० /४/२००७ रोजी दुपारी ४:००(चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**विषय क्रं. ४**

मा.सुनिल गोगले,मा.सौ.कविता वैरागे,मा.बापूराव कर्णे (गुरुजी)यांचे दि.२२/३/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.१६ मधील फुलेनगर या ठिकाणी असलेल्या वि.व.घाटे या शाळेत आदर्शइंदिरानगर, फुलेनगर,भारतनगर,शांतीनगर,या ठिकाणाहून विद्यार्थी शिक्षणाकरिता येत असतात.

तसेच ज्येष्ठ नागरिक व माहिला वर्ग या सुध्दा इंदिरानगर या ठिकाणाहून फुलेनगर या ठिकाणी रस्ता ओलांडून प्रवेश करतात. आळंदी रोड चे रुंदी करणाचे काम चालू आहे.सदर रस्ता हा २०० फूट होत आहे.

तरी इंदिरानगर पासून फुलेनगर हा भुयारी मार्ग त्वरित करण्यात यावा.

**विषय क्रं. ५**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि.३/४/२००७ चे पत्र.

हडपसर पारिजातक सोसायटी स.नं.२२३/४ अ/1 मध्ये सिरम कंपनी रस्त्यापासून गदादे यांचे घरापर्यन्त १५ फूट रस्ता कलम २०५ अन्वये ताब्यात घेऊन सदर रस्ता डांबरीकरण व कॉक्रीट करण्यात यावा.

**विषय क्रं. ६**

मा.उज्वल केसकर,मा.गणेश बिडकर यांचे दि.४/४/२००७ चे पत्र.

बी.पी.एम.सी.ॲक्ट १९४९ चे कलम ३१ अन्वये पुणे शहराच्या समाविष्ठ गावांसह विकास आराखड्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे नागरी कायदा(पुणे सिव्हील कोड)करण्यासाठी सर्व पक्षीय नगरसेवकांची प्रत्येक पक्षाचे दोन सदस्य आणि दोन कायदे/नगर नियोजन तज्ञ अशा चौदा सदस्यांची पुणे नागरी कायदा समितीची स्थापना करावी आणि त्यात एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष यांची नेमणूक करावी. तज्ञाचे मानधन प्रत्येक बैठकीला रु.१००/- निश्चित करावे.

**विषय क्रं. ७**

मा.महादेव बाबर,मा.तानाजी लोणकर यांचे दि.४/४/२००७ चे पत्र.

शासन निर्णय क्रं.पीएमसी ३००२ /२२१०७/प्र.क्रं.२२५/नवि-२२ मंत्रालय,मुंबई ४०००३२,दि.२९ जुलै २००६ नुसार महाराष्ट्र शासनाने पुणे महानगरपालिका आस्थापने वरील सहाय्यक अभियंता या पदासाठी नव्याने १३ पदांना मंजूरी दिलेली आहे. या पदांसाठी ६५००-१०५०० ही वेतन श्रेणी निर्धारित केली आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय १ पीएमसी-३०२०००१/१८८९/प्र.क्रं.२४४/ २००१/नवि/२२ मंत्रालय मुंबई ४०००३२,दि.१९/३/२००२ नुसार महानगरपालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता दिली आहे या निर्णयात सहाय्यक अभियंता या पदांना ८०००-२७५-१०७५०-३००-१६७५० ही वेतन श्रेणी निर्धारित केली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दोन्ही निर्णयामध्ये तफावत असल्याने महानगरपालिका सेवेत सन १९८५ साली लागलेल्या सेवकांवर अन्याय होऊन त्यांना आता जी वेतनश्रेणी चालूआहे त्यापेक्षाही कमी वेतनश्रेणी मिळणार असल्याने सेवकांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊन आर्थिक नुकसान होणार आहे किंबुहना बढती दिली जाईल परंतु सदर सेवक त्यांच्या आहे त्याच श्रेणीमध्ये राहून श्रेणीबाद होणार आहे.

सबब सदया अस्तित्वात असलेली व शासनाने मान्य केलेल्या ८०००-२७५-१०७५०-३००-१६७५० ही शासन मान्य श्रेणी विचारात घेऊन नव्याने निर्माण केलेल्या सहाय्यक अभियंता या पदावर बढत्या देण्यांत याव्यात.

**विषय क्रं.८**

मा.नितीन जगताप,मा.दिपक मानकर,मा.अभय छाजेड यांचे दि.१६/४/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिक ा हद्दीमध्ये गृहनिर्माण मंडळाच्या वतीने गृहनिर्माण सोसायट्या बांधण्यांत आल्या असून निरनिराळ्या टाईपच्या सदनिका महाराष्ट्र हौसिंग बोर्ड स.नं.९८/९८,गोखलेनगर,स.नं.९७/९८एकतानगर,स.नं.९७ लक्ष्मीनगर,स.नं.९२/९३ पवन सोसायटी,स.नं.९७ महर्षीनगर,स.नं.७९६ फुलेनगर,येरवडा पूर्वभागामध्ये ह्या वसाहती आहेत. मुंबई मध्ये हौसिंग बोर्डाच्या वतीने जुन्या वसाहतींना चटई क्षेत्र वाढवून दिलेले आहे. पुण्यामध्ये देखी मुंबईच्या धर्तीवर गृहनिर्माण मंडळाच्या जुन्या इमारतींना १ ऐवजी २ चटई क्षेत्र देणेत यावे.

**विषय क्रं.९**

पुणे मनपाकडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यात आलेल्या टी.डी.आर.बाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-१३६५,दि.२२/३/२००७ चे पत्र.

**विषय क्रं.१०**

पुणे पेठ घोरपडी स.नं.७२ व ७४ मधील कलम २०५ अन्वये रस्त्याच्या आखणीत व रुंदीत बदल करणेबाबत शहर सुधारणा समिती ठ.क्रं.४५७,दि.२७/११/२००३ च्या ठरावावर मा.ऑफिस ऑर्डर एम.सी./डी.ई.डी.पी./२०५ /१२,दि.५/२/२००४ ने पाठविलेला अभिप्राय त्यावर मा.मधुकर जक्कल,मा.बंडू गायकवाड यांचे दि.२१/७/२००६ च्या पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्रं.१००,दि.२१/७/२००६ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी पत्र क्रं.मआ-नअ-१३६६,दि.२२/३/२००७ ने पाठविलेला फेर अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं.११**

स्टेशन ड्युटी ऑफिसर (वे.श्रे.रु.४३००+ १००४५ + मान्य भत्ते) या पदावरील बढतीच्या नेमणूकीबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज)यांचे क्रं.मआ-सहमआ/से-००८,दिनांक ५/४/२००७ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती**

**कार्यपत्रिका क्रं. ३**

**शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि. २७/४/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**विषय क्रं. १३**

मा.सुनिल बनकर,मा.संतोष फरादें यांचे दि.१८/४/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिके तर्फे पुणे सोलापूर रोड व स्वारगेट ते कात्रज या मार्गावर बी.आर.टी.मार्ग तयार करण्यात आला आहे. सदर बी.आर.टी.मार्गावरुन ॲम्ब्यूलन्सला दवाखान्यात त्वरित पोहोचण्यासाठी बी.आर.टी.मार्गावरुन जाण्यासाठी परवानगी देण्यांत यावी.

**विषय क्रं. १४**

मा.उज्वल केसकर,मा.दत्ता खाडे यांचे दि.१८/४/२००७ चे पत्र.

मंजूर प्रादेशिक आराखड्याची एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम २७ अन्चये विकास आराखडा सुससंगत असणे आवश्यक आहे.

**२३ गांवामध्ये एकूण क्षेत्रफळ ९७८४.६० हेक्टर म्हणजे २४,४६१.५० एकर एवढे आहे. त्यापैकी**

| | |
|---|---|
| निवासी | ६.४२२.०६ हेक्टर |
| पी.एस.पी. | १६५.२६ हेक्टर |
| औद्यागिक | २३९.०८ हेक्टर |
| डिफेन्स | ७४१.१८ हेक्टर |
| शेती | ६६५.९० हेक्टर |
| ग्रीनबेल्ट | १२४.१० हेक्टर |
| एचटी/एचएस | ६६८.४२ हेक्टर |
| वन विभाग | ५२३.२४ हेक्टर |
| नदी व नाले | १८४.३३ हेक्टर |
| गावठाण | ५६.३१ हेक्टर |

प्रस्तावित डी.पी.मध्ये सदरचे क्षेत्र खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| निवासी | ४१२१.७२ |
| पाणी पुरवठा कमतरता निवासी | ३३२.६२ |
| आरक्षणाचे क्षेत्र | १७२०.१० |
| आय. टी | ८.७० |
| व्यापारी | १४९.५८ |
| पी.एस.पी. | १३७.०४ |
| औद्यागिक | २३९.०८ |
| डिफेन्स | ७३८.०१ |
| टी.पी.एस. | ५८४.६३ |
| बी.टी. व शेती व्यवसाय झोन | ७५.०० |
| हरीतपट्टी | ५१.५० |
| जंगल विभाग | ७३३.२० |
| रस्ते | ९२९.८० |
| **नदी व नाले** | १८४.३३ |

यामुळे प्रादेशिक आराखड्यात बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रस्तावासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम २० अन्वये प्रादेशिक आराखड्यात बदल करण्याची प्रकीया सुरु करावी.

**विषय क्रं. १५**

मा.शाम देशपांडे,मा.सचिन भगत यांचे दि.१९/४/२००७ चे पत्र.

पुणे शहराच्या तयार होणाऱ्या नविन डी.पी.च्या जलद अंमलबजावणीसाठी व विकास कामाना सुसगता आणण्यासाठी नगरसेवक व तज्ञांच्या मार्गदर्शना खाली पुणे सिव्हील कोडची रचना करुन महाराष्ट्र शासनास पाठविण्यात यावी.

**विषय क्रं. १६**

मा.सौ.मेधा कुलकर्णी यांचे दि.२३/४/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.६६ दीनानाथ मंगेशकर रुग्णालय,मनोहर मंगल कार्यालया मागुन जाणारा रस्ता गेली २५ वर्षे वहिवाटीचा असून ३ चाळ,१० चाळ,मुक्ता कॉम्प्लेक्स,महालक्ष्मी अपार्टमेंट,प्रस्तावित सहकहारी उद्यान,शांतीवर्धन सोसा.अशा अनेक सोसायट्यांचा व मिळकतींचा हा ॲप्रोच रोड आहे. या रस्त्याला लागून परवानाधारक दुकानदार आहेत. सदर रस्त्यावर पावसाळ्यात दलदल तयार होते व सुमारे ५००० नागरिकांची गैरसोय होते.

सदर रस्ता कलम २०५ अन्वये ताब्यांत घेऊन सदर रस्त्यावर डांबरीकरण करण्यात यावे.

**विषय क्रं. १७**

मा.सौ.मेधा कुलकर्णी,मा.विकास मठकरी,विरोधी पक्षनेते यांचे दि.२३/४/२००७ चे पत्र.

नळस्टॉप (अभिनव चौक) याठिकाणी वाहतुकीचे प्रमाण खुप मोठे आहे. या परिसरात रहाणारे ज्येष्ठ नागरिक व परिसरातील सर्व शाळांमध्ये शिकणारे सुमारे १०,००० विद्यार्थ्यांना दररोज या चौकातुन रस्ता क्रॉस करावा लागतो सदर रस्ता ओलांडणे वाहतुकीच्या समस्येमुळे सहजसाध्य नाही.

सदर चौकात भुयारी मार्ग करण्यांत यावा.

**विषय क्रं.१८**

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट क्रं.९अ(पै)येथील एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ९१ अन्वये क्षेत्र दुरुस्ती करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-५९दि.२३/४/०७ चे पत्र.

**विषय क्रं. १९**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि.३/४/२००७ चे पत्र.

हडपसर पारिजातक सोसायटी स.नं.२२३/४ अ/१ मध्ये सिरम कंपनी रस्त्यापासून गदादे यांचे घरापर्यन्त १५ फूट रस्ता कलम २०५ अन्वये ताब्यात घेऊन सदर रस्ता डांबरीकरण व कॉक्रीट करण्यात यावा.

**( टीप :-सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**शहर सुधारणा समिती**
**<u>तहकूब सभा परिपत्र</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची तहकूब सभा (शुक्रवार, दि. २७/४/२००७ रोजी तहकूब केलेलीसभा) शुक्रवार दि.४/५/२००७ रोजी दुपारी ३:५५ (तीन पंचावन्न ) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

**सदर सभेत कार्यपत्रिका क्रं.३,दि.२७/४/२००७ वरील विषय क्रं.१३ ते १९ चा विचार होईल.**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**
**शहर सुधारणा समिती**
**<u>कार्यपत्रिका क्रं. ४</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि.४ /५/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**<u>विषय क्रं. २०</u>**

मा.शिवाजी बागर,मा.राजेंद्र गोळे यांचे दि.२४/४/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.३१औध आय.टी.आय.मधील बाणेर हद्दीतील पल्लोड फार्म मधील हॉटेल महाबळेश्वर ते दत्तनगर व ग्रीनपार्क या ठिकाणी असलेल्या नाल्याच्या एका बाजूस जॉगिंग ट्रॅक व दुसऱ्या बाजूला नाला गार्डन करण्यात यावा.

**<u>विषय क्रं.२१</u>**

मा.सौ.रत्नप्रभा जगताप,मा.संदिप लडकत यांचे दि.२५/४/२००७ चे पत्र.

वानवडी स.नं.६३,हिस्सा नं.४ व ५ मधून पूर्व-पश्चिम ४० फुटी रुंदीचा डी.पी.रस्ता सन १९८७ च्या विकास आराखड्यात दर्शविला आहे. सदर रस्ता स.नं.६६ पासून सुरु होऊन स.नं.६२,६३ मधील दक्षिणोत्तर ६० फुटी डी.पी.रस्त्यापर्यंत दर्शविला आहे. सदर स.नं.६३ हिस्सा नं.४ व५ मध्ये सन १९८७ सालापूर्वी पासून अस्तित्वातील जुनी घरे आहेत, ही घरे अदमासे ३० ते ३५ वर्षापासूनची आहेत वास्तिविकत: हा रस्ता या अस्तित्वातील घरावर पडणे आवश्यक नव्हते त्यामुळे या जागेतील राहणारे नागरिक बेघर होणार आहेत याठिकाणी हिश्याच्या बाजूना वेगवेगळे कलम २०५ अन्वये २० फुटाचे रस्ते आखले आहेत तसेच ते जागेवर तयार आहेत त्यामुळे ४० फुटी रस्त्याची आवश्यकता भासत नाही.

सबब नवीन होणाऱ्या विकास आराखड्यात सदरचा ४० फुटी रस्ता वगळण्यात यावा व कलम ३७ (१) नुसार डी.पी.रस्ता रद्य करण्याची कार्यवाही सुरु करावी.

अशा आशयाचा ठराव शहर सुधारणा समितीत मान्य करुन मा.मुख्य सभेत मंजूर करावा व नंतर खात्याकडे कार्यवाहीसाठी साठी पाठवावा.

**<u>विषय क्रं. २२</u>**

मा.शिवाजी शिंदे ,मा.आबा बागुल यांचे दि.२६/४/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.३ पंपिंग स्टेशन,विश्रांतवाडी,या ठिकाणी डेक्कन कॉलेज ते पवार पेट्रोल पंपापर्यन्त रोड रुंदीकरणाचे काम चालू आहे. त्यामुळे विश्रांतवाडी या ठिकाणी हा रोड १५० फूट रुद होतआहे. या भागात भैरवनगर,टिंगरेनगर, मुंजाबा वस्ती,धानोरी लोहगांव तसेच विरोधी दिशेला कळस, चव्हाणनगर कुमार सोसायटी,लक्ष्मी टाऊन शिप हा भाग येतो. तसेच या ठिकाणी भाजी मार्केट आहे. त्यामुळे ह्या रस्त्यावर बरेच अपघात होतात.

तरी विश्रांतवाडी पोलिस चौकी समोरील चौकात भुयारी मार्ग करण्यात यावा.

**विषय क्रं. २३**

मा.गणेश बिडकर,मा.विकास मठकरी,विरोधी पक्षनेते यांचे दि.२७/४/२००७ चे पत्र.

पुणे येथील भुसारि कॉलनी मधील मान्य ले-आऊट मा.कलेक्टर यांनी रद्द केला आहे. त्यामुळे तेथील एकुण ८० हजार फुटाचे भुखंड निवासी होण्याची शक्यता आहे.म्हणुन भुसारि कॉलनी येथील ले-आऊट पुणे महानगरपालिकेतर्फे पुन्हा प्रस्तावित करण्यात यावा. व या ले-आऊट मधील ओपन स्पेस च्या जागांवर निवासी बांधकामाचा कोणताही प्रस्ताव मंजुर करु नये.

**विषय क्रं. २४**

मा.सुनिल टिंगरे ,मा.ज्ञानेश्वर शिंदे यांचे दि.२७/४/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.२ मधील स.नं.२४१ मधील ५ नाईन चौक ते जे.पी.नगर मधून श्रीनंदा यांचे प्लॉट मधून नवीन हद्दीमधील धानोरी सर्व्हे नं.३२ मधील ३० मी.डी.पी.रस्त्यास जोडणारा नवीन १२ मीटर रस्ता कलम २०५ अन्वये आखणेत यावा.

**विषय क्रं.२५**

नगर रचना अंतिम भूखंड क्रं.७६ बाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-६४ दि.२५/४/०७ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**<u>पुणे महानगरपालिका</u>**

**शहर सुधारणा समिती**

**<u>कार्यपत्रिका क्रं. -५</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा बुधवार दि.९/५/२००७ रोजी सकाळी ११:३५ (अकरा पस्तीस) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विचार होईल.

**<u>विषय क्रं. २६</u>**

मा.किरण बारटक्के यांचे दि.३/५/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेत सध्या नगर अभियंता हे एकच पद आहे. पुणे शहराची व्याप्ती व लोकसंख्या वाढ हयांचा आढावा घेता तसेच मा. नगरसेवकांच्या /नागरिकांच्या प्रश्नांना सध्याचे नगर अभियंता वेळ देवू शकत नाही ही बाब प्रमुख्याने निुर्शनास येत असल्यामुळे तसेच पुणे शहराचा सध्या संथ गींीने चालू असलेकला विकास पाहाता पुणे शहराच्या विकासासाठी 'नगर अभियंता' ही दोन पदे निर्माण करावीत व मुठा नदीमुळे पुणे शहराची दक्षिण-उत्तर असेक दोन नैसर्गिक भागांसाठी प्रत्येक एक-एक 'नगर अभियंता'नेमावेत प्रत्येकी एक 'नगर अभियंता'नेमूण त्यांचेकडे स्वतंत्ररित्या वेग -वेगळा कार्यभार सोपवावा म्हणजे भविष्यात पुण्याचा विकास जलद गतीने होण्यास मदत होईल.

सध्या नगरअभियंता यांच्याकडे बांधकाम नियंत्रण, विकास योजना,भवन रचना, पथ हया विभागांचा कार्यभार आहे.तसेच जे अपिल प्राधिकारी शासकिय माहितीचा अधिकार कामकाज आहे.दोन नगर अभियंता पद निर्माण झाल्याने व वरील कामकाज दोन्ही पदांना दक्षिण उत्तर अशी हद्यीची विभागणी करून दिल्याने पुण्याचा विकास जलदगतीने होईल.

तरी उत्तर नगर अभियंता व दक्षिण नगर अभियंता हे पद लवकरात लवकर निर्माण करून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

**<u>विषय क्रं. २७</u>**

मा.सौ.चाँदबी नदाफ व मा. संतोष आरडे यांचे दि.३/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. ३९ मध्ये जहॉगिर हॉस्पिटल चौकामध्ये वाहतुकीचे प्रमाण ब-याच मोठया प्रमाणावर आहे. त्याठिकाणी रोज वाहतुकीची कोंडी होत असते त्यामुळे नागरिकांना रस्ता क्रॉस करणे फार अडचणीचे होत आहे.

तरी जहॉगिर हॉस्पिटल चौकामध्ये वाकडेवाडी याठिकाणी ज्या पध्दतीने दोन व तीन चाकी गाडयांसाठी भुयारी मार्ग करण्यात आलेला आहे. त्याच पध्दतीने जहॉगिर हॉस्पिटल येथे भुयारी मार्ग करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. २८</u>**

मा.संजय भोसले व मा. दिपक गावडे यांचे दि.४/५/२००७ चें पत्र.

वॉर्ड क्रं. २१ मधील स.नं.२४७/१४ राठी चेंबर समोर डेक्कन कॉलेज रोड या ठिकाणी असणा-या मोकळया जागेवर 'प्ले ग्राऊंडचे' आरक्षण टाकण्यात यावे

**<u>विषय क्रं. २९</u>**

मा.संजय भोसले व मा. दिपक गावडे यांचे दि.४/५/२००७ चें पत्र.

वॉर्ड क्रं. २१ स.नं.२४७/१४ ओपेला बिल्डिंग शेजारी असणा-या मोकळया जागेवर 'उद्यानचे' आरक्षण टाकण्यात यावे.

**नगरसचिव ,**
**पुणे महानगरपालिका**

पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
तहकूब सभा परिपत्र -१

शहर सुधारणा समितीची तहकूब सभा (शुकवार दि. ४/५/२००७ रोजी तहकूब केलेली सभा) बुधवार दि.९/५/२००७ रोजी सकाळी ११:२५ (अकरा पंचवीस) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्रं. ३, दि.२७/४/२००७ वरील विषय क्रं. १३ ते १९ चा विचार होईल.

नगरसचिव ,
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका
शहर सुधारणा समिती
तहकूब सभा परिपत्र -२

शहर सुधारणा समितीची तहकूब सभा (शुकवार दि. ४/५/२००७ रोजी तहकूब केलेली सभा) बुधवार दि.९/५/२००७ रोजी सकाळी ११:३० (अकरा तीस) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्रं. ४, दि.४/५/२००७ वरील विषय क्रं. २० ते २५ चा विचार होईल.

नगरसचिव ,
पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिका<br>शहर सुधारणा समिती<br><u>कार्यपत्रिका क्रं. ६</u>

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि.१८ /५/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**<u>विषय क्रं. ३०</u>**

मा.अभिजित शिवरकर.मा.सौ.मंगला मंत्री,मा.नितिन जगताप यांचे दिनांक ९/५/२००७ चे पत्र.

वानवडी स.नं.८/९येथे गेली २५ वर्षापासून गार्डनचे आरक्षण आहे.या सर्व्हे नं ८/९मध्ये जवळ जवळ अंदाजे ५०० नागरिक राहत आहे. येथे अनेक वर्षापासून चौघुले मळा नावाची वस्ती आहे. स.न. ८च्या लगत विठ्ठलराव शिवरकर नामक ६ एकराच्या जागेत मनपाचे मोठे उद्यान (गार्डन) आहे. सदरचे गार्डन गेली वीस वर्षापासूनचे आहे. या आरक्षणाच्या लगत गार्डन असल्याने या सर्व्हे नं. (८ व ९ ) मध्ये उद्यान आरक्षणाची आवश्यकता नाही, तरी येथील गार्डनचे आरक्षण रद्द करण्यात यावे. व या ठिकाणची जागा स.नं. ८ व ९ निवासी विभागात समाविष्ट करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ३१</u>**

मा. दिपक मानकर, मा. किरण बारटक्के यांचे दिनांक ११/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्र. ५७ शंकरराव मोरे विद्यालय स.नं. ४४, अे.आर. अे.आय. लगतचा भाग विठ्ठल मंदिर येथील परिसर, हनुमान नगर राजीव गांधी पार्क या ठिकाणी सुमारे ४ ते ५ हजार लोकांची वस्ती असून गेले ४० वर्षापासून नागरिक त्याठिकाणी रहात आहे. त्यांना अद्यापही पुणे मनपा तर्फे कोणतेही नागरी सुविधा देण्यात आलेली नाही. तरी सदर भाग ग.व.नि. घोषित करण्यात यावा. व नागरिकांना पुणे मनपा तर्फे नागरी सुविधा देण्यात यावेत.

**<u>विषय क्रं. ३२</u>**

मा. विशाल तांबे, मा. दत्तात्रय धनकवडे यांचे दिनांक ११/५/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या मौजे धनकवडी नवीन हद्दीध्ये कोठेही गार्डनचे आरक्षण नाही. सदरचा भाग हा अत्यंत दाट लोकवस्तीचा असल्याने तेथे श्रींपस डशिलिश असणे गरजेचे आहे. सदर ठिकाणी स.नं. २९ धनकवडी येथे अंदाजे ८००० चौ. मी. चा पट्टा मोकळा आहे. त्याचा वापर सध्या तेथील लहान मुले खेळण्यासाठी वापरतात. तसेच जागेवर कोणत्याही स्परूपाचे बांधकाम नाहीत. या पूर्वी तेथे मा. जिल्हाधिकारी यांनी लेआऊट मंजूर केला होता. या लेआऊट नुसार सदर ठिकाणी बांधकामे झालेली आहेत. त्या लेआऊट मधील मोकळ्या जागेचे क्षेत्रफ ळ अंदाजे ८००० चौ.मी. आहे. मात्र आता मा. जिल्हाधिकारी यांनी सदरचा लेआऊट रद्द केला आहे. सदर ठिकाणी निवासी झोन

असल्याने बांधकाम परवानगी दिली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर ठिकाणी कोणतीही बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये.

तरी स.न. २९, धनकवडी या लेआऊट मधील ८००० चौ.मी. जागेवर गार्डनचे आरक्षण टाकण्यात यावे. यामुळे तेथिल स्थानिक वयोवृध्द, लहान मुले व महिला नागरिकांची सोय होईल.

**<u>विषय क्रं. ३३</u>**

बत्ती इन्स्पेक्टर वर्ग - ३ (वे.श्रे.रू.३५४०/- ते ८१३५ + मान्य भत्ता) एकवट वेतन द.म. प्रथम वर्ष रूपये ३०००/- व्दितीय वर्ष ३५००/- तृतीय वर्ष ४०००/- या हुद्दयाची जागा भरण्यासाठी मा.महा.आयुक्त यांचे क्रं.अतिमहा /सह/मआ/से/८७ दि.७/५/०७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ३४</u>**

उप उद्यान अधिक्षक (झू) वर्ग - २ (वे.श्रे.रू.८०००/- ते १६७५० + मान्य भत्ते) एकवट वेतन द.म. प्रथम वर्ष रूपये ८०००/- व्दितीय वर्ष ८५००/- तृतीय वर्ष ९०००/- या हुद्दयाची जागा भरण्यासाठी मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआमहा /सह/मआ/से/१०६ दि.९/५/०७ चे पत्र.

**विषय क्रं. ३५**

पुणे मनपा च्या भवन रचना विभागाकडे पेंटर (एकवट वेतन द.म. प्रथम वर्ष रूपये २७००/- व्दितीय वर्ष ३२००/- तृतीय वर्ष ३७००/- व तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतन श्रेणी रू. २७५० ते ५६९०+ मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.अमआ(ज) /सहमआ/नअ/से/११० दि.९/५/०७ चे पत्र.

**विषय क्रं. ३६**

हॉटीकल्चरल मिस्त्री वर्ग - ३ (वे.श्रे.रू.४०००/- ते ६००० + मान्य भत्ते) एकवट वेतन द.म. प्रथम वर्ष रूपये ४३००/- व्दितीय वर्ष ४८००/- तृतीय वर्ष ५३००/- या हुद्दयाची जागा भरण्यासाठी निवडयादी/प्रतिक्षायादी तयार करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.अतिमहा /सह/मआ/से/१११ दि.९/५/०७ चे पत्र.

**विषय क्रं. ३७**

नगरउप अभियंता (व्हेईकल डेपो) कार्यालयाकडील व्हेईकल डेपो इन्स्पेक्टर या हुद्दयाच्या जागा भरण्यासाठी तयार केलेल्या निवडयादी/प्रतिक्षायादीस व निवड यादीवरील सेवकांच्या नेमणूका करण्यास मान्यता मिळणेबाबत. मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ /सहआ/से/११३ दि.९/५/०७ चे पत्र.

**विषय क्रं. ३८**

नगर रचना अंतिम भूखंड क्रं.७६ बाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-६४ दि.२५/४/०७ चे पत्र.

(टिप:- विषय क्र. ३८ चा विचार पुढील सभेत करावा असे मागील सभेत ठरले आहे.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**<u>पुणे महानगरपालिका</u>**

**शहर सुधारणा समिती**

**<u>कार्यपत्रिका क्रं. -७</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार दि.२५/५/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल

**<u>विषय क्रं. ३९</u>**

मा.सुनिल टिंगरे व मा.प्रमोद निम्हण यांचे दि.१७/५/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. २ मध्ये खाजगी बांधकाम व्यवसायिकांची ब-याच प्रमाणात बांधकामे सुरू असून,सदर बांधकाम मजुरांची कोणतेही नागरी सुविधा उपलब्ध करून न देता ते सदर ठिकाणी झोपडपट्टी बांधून राहतात. त्याची स्वच्छतागृहाची व संडांसाची कोणतेही सुविधा त्यांना दिली जात नसल्याने ते लगतच्या मोकळ्या जागेत कायम वापर करतात. त्यामुळे आरोग्य विधायक परिस्थिती निर्माण होते.

तरी पुणे मनपा हद्दीमध्ये बांधकाम करताना सदर मजुरांची स्वच्छतागृहाची (संडासाची ) सोय केल्याशिवाय बांधकाम परवाना देण्यात येऊ नये.

**<u>विषय क्रं. ४०</u>**

मा.महादेव बाबर व मा.दिलिप बराटे यांचे दि.२१/५/२००७ चे पत्र.

सन २००१ नंतर २००७ पर्यत झालेल्या गुंठेवारी पध्दतीच्या बांधकामांना गुंठेवारी करण्यासाठी मुदत वाढ देण्यात यावी.

**<u>विषय क्रं. ४१</u>**

मा.अभिजित शिवरकर, मा. राजेंद्र काची, मा. लक्ष्मण आरडे मा.शिवाजी शिंदे यांचे दिनांक २१/५/२००७ चे पत्र.

पुणे कॅन्टोन्मेंट परिसरातील येवलेवाडी,कोंढवा खुर्द,कोंढवा बुद्रुक, लेप्रेसी हॉस्पिटल, मिठानगर,भाग्योदयनगर,वानवडी परिसर,घोरपडी परिसर इत्यादी परिसरात बकरी हिल येथील पाण्याच्या टाकीमधून पाणीपुरवठा होतो.

सदर बकरी हिलची पाण्याची टाकी ६१ लाख लीटर क्षमतेची आहे.परंतु सध्या वरील सर्व परिसरात वाढती लोकसंख्या, पुणे शहराचे वाढते शहरीकरण,विस्तारीकरण व वाढती नागरवस्ती यामुळे बकरी हिल टाकीचा पाणी पुरवठा अत्यंत कमी पडत आहे.त्यामुळे नागरिकांना फारच अडचणी व गैरसोय निर्माण झाल्या असून अनेक तक्रारीही वाढलेल्या आहेत.

तरी वरील परिसरासाठी नियमित व आवश्यक पाणी पुरवठा होण्याकरिता बकरीहिल येथील टाकीलगत १ कोटी लीटर क्षमतेची नविन पाण्याची टाकी बांधण्यात यावी..

**<u>विषय क्रं. ४२</u>**

मा.अभिजित शिवरकर मा. राजेंद्र काची मा.लक्ष्मण आरडे मा.शिवाजी शिंदे यांचे दिनांक २१/५/२००७ चे पत्र.

पुणे शहराच्या पूर्व भागाचा फार मोठया झपाटयाने विस्तार होत आहे.सदर भागात सध्या नवनविन व मोठया प्रमाणात टाऊनशिप येत आहेत.पुणे महानगरपालिका हद्दीत हजारो एकरांमध्ये बांधकामे चालू आहेत. या सर्व गोष्टींचा बारकाईने विचार केल्यास सध्याचा पाणी पुरवठा हा अत्यंत तुटपुंजा आहे.

तरी हडपसर येथील ग्लायडिंग सेंटर लगत तुकाई टेकडीवर नविन वॉटर्र वर्क्स (जलकेंद्र) बांधण्यात यावे.

**<u>विषय क्रं. ४३</u>**

मा.अभिजित शिवरकर मा. राजेंद्र काची ,मा. लक्ष्मण आरडे, मा.शिवाजी शिंद यांचे दिनांक २१/५/२००७ चे पत्र.

पुणे महानगरपालिके तर्फे हडपसर परिसर, मगरपट्टा, महमंदवाडी, सय्यदनगर, चितांमणीनगर, गांधळेनगर ,सातववाडी, १५नंबर विठ्ठलनगर, माळवाडी साडेसतरानळी, हडपसर इंडस्ट्रिंज,रामटेकडी

इंडस्ट्रिंज रामनगर, लोहियानगर, वेताळबाबा वसाहत, वैदूवाडी, कवडेरोड, भिमनगर, शिर्केवस्ती, घोरपडी मुंढवा, केशवनगर, शेवाळेवाडी, महादेवनगर, मांजरी, मांजरी-फार्म इत्यादी परिसरात पाणी पुरवठा करणेसाठी, ९० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी रामटेकडी येथे बांधण्यात आली वरील परिसर तसेच खराडी व वडगावशेरी परिसरालाच याच टाकीतून पाणी- पुरवठा होत आहे.परंतु सध्या वरील नमूद परिसरात वाढती लोकसंख्या,वाढते शहरीकरण,वाढती लोकवस्ती,यामुळे रामटेकडी येथील ९० लाख लिटर क्षमतेची पाण्याची टाकी कमी पडत आहे.

तरी नागरिकांना नियमित व वेळेत पाणी पुरवठा होणेसाठी रामटेकडी येथील सध्याच्या ९० लाख लिटर टाकीच्या शेजारी १ कोटी लिटर क्षमतेची नविन टाकी बांधण्यात यावी

**<u>विषय क्रं. ४४</u>**

असिस्टंट इलेक्ट्रिशियन वर्ग ३ (वे.श्रे.रू.३५४०/- ते ८१३५+ मान्य भत्ते)एकवट वेतन द.म. प्रथम वर्ष रूपये ३०००/- व्दितीय वर्ष ३५००/- तृतीय वर्ष ४०००/- या हुद्याच्या रिक्त जागा भरणेसाठी निवडयादी/प्रतिक्षायादीस शहर सुधारणा समिती मार्फत मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत.मा.अति. महा. आयुक्त (ज) यांचे क्रं.मआ /सहमआ/से/१३५ दि.१९/५/०७ चे पत्र.विचारासाठी.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती**

**<u>कार्यपत्रिका क्रं. ८</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि.१ /६/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**<u>विषय क्रं. ४५</u>**

मा. अभिजित शिवरकर. मा. सौ. मंगला मंत्री, मा. नितिन जगताप यांचे दिनांक ९/५/२००७ चे पत्र.

वानवडी स.न.८/९ येथे गेली २५ वर्षापासून गार्डनचे आरक्षण आहे. या सर्व्हे नं.८/९ मध्ये जवळ जवळ अंदाजे ५०० नागरिक राहत आहेत. येथे अनेक वर्षापासून चौघुले मळा नावाची वस्ती आहे. स.नं.८ च्या लगत विठ्ठलराव शिवरकर नामक ६ एकराच्या जागेत मनपाचे मोठे उद्यान (गार्डन) आहे. सदरचे गार्डन गेली वीस वर्षापासूनचे आहे. या आरक्षणाच्या लगत गार्डन असल्याने या सर्व्हे नं.(८ व ९) मध्ये उद्यान आरक्षणाची आवश्यकता नाही. तरी येथील गार्डनचे आरक्षण रद्द करण्यात यावे व या ठिकाणची जागा स.नं.८ व ९ निवासी विभागात समाविष्ट करण्यात यावा.

**<u>विषय क्रं.४६</u>**

मा.मोरे वसंत, मा.ॲड्.शिंदे किशोर यांचे दि. २३/५/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.१४१(कात्रजगावठाण) येथिल स.नं.३ कात्रज मध्ये पुणे महानगरपालिकेने १० वर्षापूर्वी रेल्वे म्युझियम करीता जागा आरक्षित केलेली आहे. परंतु या ठिकाणी आजूबाजूला मोठ्या प्रमाणांत नागरी वस्ती वाढलेली असून येथिल नागरिकांना आपल्या मुलांना फिरण्यासाठी व खेळण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे व या ठिकाणी रेल्वे म्युझियमची आवश्यकता नाही. हे रेल्वे म्युझियमचे आरक्षण बदलून या ठिकाणी उद्यानाची आवश्यकता असल्याने या तलावाला लागून जॉगिंग ट्रॅक विकसित करण्यांत येणार आहे. त्यामुळे या तलावाला भेट दयायला येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असणार आहे.व स्थानिक नागरिकांची गरज लक्षांत घेऊन रेल्वे म्युझियमचे आरक्षण रद्द करण्यांत यावे व या जागी उद्यान विकसित करण्यांत यावे.

**<u>विषय क्रं.४७</u>**

मा.दिलिप उंबरकर, मा.सौ.कमल व्यवाहरे यांचे दि. २४/५/२००७ चे पत्र.

स.नं.११०/११३ येथील जागा मनपा शाळेसाठी आरक्षित करण्यात यावी.त्यामुळे सुतारदरा व कि ष्किंदानगर येथे शाळा सुरु करण्यात यावी.

**<u>विषय क्रं.४८</u>**

मा.सौ.सिमा सरदेशपांडे,मा.सौ.उज्वला पावटेकर यांचे दि. २८/५/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.५१ शनिवारवाडा या वॉर्डातून संपूर्ण पुणे शहरातील नागरिकांचे वाहतूकीचे प्रमाण सर्वाधिक आहे. पुणे मनपा ते शनिवारपेठ येथील नविन पुलावरुन (टिळक पुल) वाहतूक वाढल्यामुळे तेथे वाहतुकीची कोंडी होते. तरी येथील नियोजीत रस्ता करणेसाठी अमृतेश्वर मंदिराची सिमाभिंत ८ ते १० फुट मागे हटवून रस्ता करण्यात यावा.

**<u>विषय क्रं.४९</u>**

मा.सुनिल टिंगरे,मा.सुनिल बनकर यांचे दि.२५/५/२००७ चे पत्र.

पुणे शहरामध्ये खाजगी बांधकाम व्यावसायिकांची बऱ्याच प्रमाणात बांधकामे सुरु असून,सदर बांधकाम मजुरांची कोणत्याही नागरी सुविधा उपलब्ध करुन न देता ते सदर ठिकाणी झोपडपट्टी बांधून राहतात.त्याची स्वच्छतागृहाची व संडासाची कोणतेही सुविधा त्यांना दिली जात नसल्याने ते लगतच्या जागेत कायम वापर करतात.त्यामुळे आरोग्य विधायक परिस्थिती निर्माण होते.

तरी पुणे मनपा हद्दीमध्ये बांधकाम करताना इन्यूरंन्स,वॉटर,लाईट,संडास,सेप्टी नेट,पत्र्याची शेड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिल्या शिवाय बांधकामास(प्लिंथ चेकिंग ) देऊ नये. उर्वरित सर्व जबाबदारी बिल्डरवर राहील.

**विषय क्रं.५०**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि.२५/५/२००७ चे पत्र.

हडपसर माळवाडी येथे साधना विद्यालयापासून तुपे नगर पर्यंत १० इंची पाण्याची लाईन टाकण्यात यावी.

**विषय क्रं.५१**

मा.सौ.सुलोचना तुपे यांचे दि.२५/५/२००७ चे पत्र.

हडपसर गाडीतळ आग्रवाल हॉटेल पासून खुटवड बिल्डिंग शतानंद कॉमप्लेक्स,पी.एम.टी.डेपो व डी.पी.रोड चेंबर पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेची व्यवस्था करावी.

**विषय क्रं.५२**

नगर रचना अंतिम भूखंड क्रं.७६ बाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं.मआ-नअ-६४ दि.२५/४/०७ चे पत्र.

**(टिप:- विषय क्र. ५२ चा विचार पुढील सभेत करावा असे दि.१८/५/०७ च्या सभेत ठरले आहे.)**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती**

**<u>कार्यपत्रिका क्रं. ९</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि.८ /६/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**<u>विषय क्रं. ५३</u>**

मा.सौ.रंजना टिळेकर,मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.१/६/२००७ चे पत्र.

स.नं.६१ मधून कात्रज स.नं.१८ मधील डी.पी.रस्त्यास मिळण्यासाठी २०५ खाली रस्ता आखण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ५४</u>**

मा.सौ.रंजना टिळेकर,मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.१/६/२००७ चे पत्र.

कोंढवा बु ाा गावठाण स.नं.१ मधून स.नं.६६ मार्गे गंगादास शंत्रुंजय मंदिर रस्तयास जाणारा रस्ता २०५ खाली आखण्यात यावा.(१२ मीटर)

**<u>विषय क्रं. ५५</u>**

मा.सौ.रंजना टिळेकर,मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.१/६/२००७ चे पत्र.

स.नं.३ लक्ष्मीनगर कोंढवा बु ाा येथुन मुख्य रस्त्याने स.नं.४ मध्ये जाणाऱ्या २४ मी.डी.पी.रस्त्यास जोडणारा २०५ खाली रस्ता आखण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ५६</u>**

मा.अनिल भासेले,सभागृहनेते,मा.विकास मठकरी,विरोधी पक्षनेते,मा.शाम देशपांडे यांचे दि.१/६/२००७ चे पत्र.

पुणे संगमवाडी येथील सादल बाबा दर्गा कडे जाणारा ३० मी. रुंदीचा डि.पी.रस्त्याच्या प्रमाण रेषे मध्ये रस्त्यामध्ये येणारी नागरिकांची घरे वाचविणेसाठी बदल करण्यात यावा. हा रस्ता दक्षिणेकडून ३० मी. स्थलांतरीत करणेत यावा.

यासाठी एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ३७(१) अन्वये गौण फेरफाराची कार्यवाही सुरु करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ५७</u>**

मा.भिमराव खरात,मा.किरण बारटक्के यांचे दि.४/६/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.७ मध्ये खुळेवाडी स.नं.१४८ व १४७ मधुन ९ मीटरचा २०५ खाली रस्ता आखण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ५८</u>**

मा.संजय नांदे,यांचे दि.५/६/२००७ चे पत्र.

आंबेगाव बु.मधील सर्व्हे नं.३१/१ व ३१/२ येथील नागरिकांच्या हितासाठी पूर्व-पश्चिम असा कलम २०५ अन्वये ९ मीटरचा रस्ता आखण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ५९</u>**

नो पार्किंग झोन मध्ये उभी केलेल्या वाहनांवर कारवाई करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-वानि-१५५,दि.२९/५/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ६०</u>**

पुणे महानगरपालिका हद्दीतून जाणऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते पुणे महानगरपालिकेना हस्तांतरित करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-वानि-१५६,दि.२९/५/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ६१</u>**

पुणे मनपा कडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यांत आलेल्या टी.डी.आर.बाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-नअ-१६३,दि.१/६/२००७ चे पत्र.

**विषय क्रं. ६२**

पुणे मनपाच्या विद्युत विभागाकडील '' असिस्टंट इलेक्ट्रिशियन''वर्ग - ३ (एकवट वेतन द.म. प्रथम वर्ष रूपये ३०००/- व्दितीय वर्ष ३५००/- तृतीय वर्ष ४०००/-व ३ वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर (वे.श्रे.रू.३५४०/- ते ८१३५ + मान्य भत्ते,मनपा सेवकांना एकवट वेतनाची अट लागु नाही.)या हुद्दयाची रिक्त पदे भरणेसाठी मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्रं.अतिमहा /सह/मआ/से/१३५ दिनांक १९/५/०७ चे पत्र.

(टिप :- विषय क्रं.६२ चा विचार १५ दिवासांनी करावा असे दि.२५/५/२००७ च्या सभेत ठरले.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**पुणे महानगरपालिका**

**शहर सुधारणा समिती**

**<u>कार्यपत्रिका क्रं. १०</u>**

**<u>शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार, दि.१५/६/२००७ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.</u>**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**<u>विषय क्रं. ६३</u>**

मा.सुनिल बिबवे,मा.भिमराव खरात,यांचे दि.५/६/२००७ चे पत्र.

पुणे बिबवेवाडी ६३५(पार्ट) ही मिळकत पुणे मनपाच्या ड्राफ्ट डि.पी.प्लॅन मध्ये गार्डन (४-६) साठी आरक्षित दर्शविली होती.हा विकास आराखडा मान्य करताना शासनाने हे आरक्षण बदलून ते क्रिडांगणासाठी एम-१२३ या मा चेवळषळलरींळेप ने आरक्षित केली आहे. परंतु बिबवेवाडी गावठाण व परिसरात पुणे मनपाचे अथवा दुसरे कोणतेच उद्यान नसल्याने नागरिकांची अडचण होत आहे. त्यामुळे हे क्रिडांगणाचे आरक्षण पुणे मनपाच्या मुळ प्रस्तावा प्रमाणे गार्डन म्हणून आरक्षित करावे.

**<u>विषय क्रं. ६४</u>**

मा.सुनिल टिंगरे,मा.विशाल तांबे यांचे दि.५/६/२००७ चे पत्र.

वाडिया कॉलेज ते रुबी हॉल चौकापर्यन्त वाहतूकीची अत्यंत कोंडी होत असून,सदर रस्ता वाहतूकीस खूप प्रमाणात अपूरा पडत आहे. त्याकरिता रुबी हॉल क्लिनिक ते लिमेरेडिन हॉटेल पर्यन्त उड्डाण पूल करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ६५</u>**

मा.सौ.अश्विनी कदम,मा.संदिप लडकत यांचे दि.८/६/२००७ चे पत्र.

वॉ.क्रं.१२५,पद्मावती -अरण्येश्वर मधील स.नं.६२/२/क,मोरे वस्ती वसाहतीचा अर्धा भाग हा गवनि घोषित असून उर्वरित भाग गवनि घोषित करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ६६</u>**

मा.संतोष फरांदे यांचे दि.८/६/२००७ चे पत्र.

आंबेगांव बु.मधील सर्व्हे नं.३१/१ व ३१/२ येथील नागरिकांच्या हितासाठी पूर्व-पश्चिम असा कलम २०५ अन्वये ९ मीटरचा रस्ता आखण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ६७</u>**

पुणे मनपाच्या अग्नीशामक दलाकडे '' ॲब्युलन्स अटेन्डंट '' (एकवट वेतन दरमहा प्रथम वर्ष रु.२८००/- व्दितीय वर्ष ३३००/- तृतीय वर्ष रु.३८०० /- व तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतन श्रेणी रु.२८८० ते ५७८०+मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज)यांचे क्रं. मआ-सहमआ-नअसे-१७१,दि.८/६/०७ चे पत्र

**<u>विषय क्रं. ६८</u>**

नो पार्किंग झोन मध्ये उभी केलेल्या वाहनांवर कारवाई करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-वानि-१५५,दि.२९/५/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ६९</u>**

पुणे महानगरपालिका हद्दीतून जाणऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते पुणे महानगरपालिकेना हस्तांतरित करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-वानि-१५६,दि.२९/५/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ७०</u>**

पुणे मनपा कडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यांत आलेल्या टी.डी.आर.बाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-नअ-१६३,दि.१/६/२००७ चे पत्र.

(टिप :- विषय क्रं. ६८ ते विषय क्रं.७० चा विचार पुढील सभेत करावा असे मागिल सभेत ठरले.)

**नगरसचिव,**

**पुणे महानगरपालिका**

<u>पुणे महानगरपालिका</u>
**शहर सुधारणा समिती**
<u>**तहकूब सभा परिपत्र**</u>

<u>**शहर सुधारणा समितीची तहकूब सभा (शुकवार दि. १५/६/२००७ रोजी तहकूब केलेली सभा) शुक्रवार दि.२२/६/२००७ रोजी दुपारी ३:१५ (तीन पंधरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**</u>

सदर सभेत कार्यपत्रिका क्रं. १०, दि.१५/६/२००७ वरील विषय क्रं. ६३ ते ७० चा विचार होईल.

नगरसचिव ,
पुणे महानगरपालिका

<u>पुणे महानगरपालिका</u>
**शहर सुधारणा समिती**
<u>**कार्यपत्रिका क्रं. -११**</u>

<u>**शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार दि.२२/६/२००७ रोजी दुपारी ३:२० (तीन वीस) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**</u>

सदर सभेत खालील विचार होईल.

<u>**विषय क्रं. ७१**</u>

मा.सौ.अश्विनी कदम व मा.संदिप लडकत यांचे दि.८/६/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं.१२५ पद्मावती - अरण्येश्वर,स.नं.६१,येथील ट्रेजर पार्कला मंजुर नकाशा प्रमाणे मधून अ‍ॅक्सेस दिलेला आहे.सदरील पार्कला मधून अ‍ॅक्सेस न देता ऐका बाजूने अ‍ॅक्सेस देण्यात यावा.

<u>**विषय क्रं. ७२**</u>

मा.पृथ्वीराज सुतार व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि.१३/६/२००७ चे पत्र.

कोथरूड येथील पौड रस्त्याकडून थोरात उद्यान कर्वे रोड कडे जाणा-या ओढयाचे पाणी शिवतीर्थ नगर येथील चौकात पावसाळयात पाणी साचून राहते तसेच अनेक सोसायटया मध्ये हे पाणी जाते तसेच वाहतुकीचाही खोळंबा होतो.

तरी संबधीत चौकात तातडीने पूल बांधण्यत यावा.

<u>**विषय क्रं. ७३**</u>

मा.सुनिल बनकर व मा.चेतन तुपे यांचे दि.१३/६/२००७ चे पत्र.

तुकाई टेकडी (हडपसर) येथे स.नं.३५ याठिकाणी ८० लाख लिटर पाण्याची टाकी बांधण्यात यावी.

<u>**विषय क्रं. ७४**</u>

मा.पृथ्वीराज सुतार व मा.सुनिल कांबळे यांचे दि.१३/६/२००७ चे पत्र.

पुणे शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्याने वाहनांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. रोजच वाहतुकीचा खोळंबा होत असल्याने नागरिकांची फार मोठी गैरसोय होत असते पार्किंगची व्यवस्था नसल्याने अनेक ठिकाणी रस्त्यावरती पार्किंग होत असल्याने या गैरसोयीत अजूनच भर पडत आहे.तरी मनपाने शहरातून जे ओढे गेलेले आहेत त्यावरती तांत्रिक दृष्टया शक्य होई तेथे युध्दपातळीवर ओढयावरती स्लॅब टाकून पार्किंगची व्यवस्था करावी.

**विषय क्रं. ७५**

मा.सौ.रेखा चंद्रकांत टिंगरे यांचे दि.१२/६/२००७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १ धानोरी येथील स.नं.५१ भैरवनगर येथील मनपा शाळा क्रं.१५६ बी येथील आपेन स्पेस हा पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा असून सद्या त्याठिकाणी उद्यान विभागा मार्फत सिमा भिंतीचे काम चालू आहे. सदरच्या सिमाभिंतीमुळे आपन स्पेस शेजारील भैरवनगर येथील नागरिकांना रस्ता उपलब्ध होणार नाही.तरी वरील ठिकाणच्या ओपन स्पेस १५ फुटी रस्ता आखण्यात यावा त्यामुळे नागरिकांची जाण्या-येण्याची गैरसोय दूर होईल.

**विषय क्रं. ७६**

मा.बाबूराव चांदेरे व मा.सागर माळकर यांचे दि.१४/६/२००७ चे पत्र.

पुणे मनपाच्या वतीने बाणेर स.नं.७ व ४९ येथे बायोडार्व्हसिटी पार्क विकसित करणेत येत आहे.याच जागेवर तुकाई मंदिर तसेच महादेवाची पुरातंन लेणीही आहे.या टेकडीवर मनपाच्या वतीने पाण्याची टाकी बांधींचा प्रस्ताव मंजूर आहे.या टेकडीवर जाणेसाठी बाणेर गावातून मार्ग नाही. यासाठी बाणेर गावाजील मनपा शाळा क्रं. १५१बी,लगतच्या रस्त्यापासून सि.स.नं.३१ मधून व ३२ च्या पूर्व बाजूने काही भाग ३० फुटी रुंदीचा रस्ता कलम २०५ अन्वये आखणेत यावा. सदर रस्ता ३० फुटी रुंदीचा उत्तर ते दक्षिण असा दर्शविण्यात यावा.

सोबत सिटी.सर्व्हे नंबरचा नकाशा जोडलेला आहे.

**विषय क्रं. ७७**

मा.श्रीकांत पाटील व मा.अनिल भोसले,सभागृह नेते यांचे दि.१६/६/२००७ चे पत्र.

बोपोडी ते सांगवी यांना जोडणा-या नविन पूलाचे ॲप्रोचसाठी बोटॅनिकल गार्डनच्या पूर्वेकडील बाजूकडून १८.०० मी रूंदीचा जयकर पथ येथे जोडणारा रस्ता एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम २०५ अन्वये आखण्यात यावा.

**विषय क्रं. ७८**

मा.संतोष फरांदे यांचे दि.१६/६/२००७ चे पत्र.

शहर सुधारणा समिती विषय दि. ६६,दि.१५/६/२००७ चा दप्तरी दाखल करण्यात यावा. (आंबेगाव बु.मधील सर्व्हे नं.३१/१ व ३१/२ येथील नागरिकांच्या हितासाठी पूर्व पश्चिम असा कलम २०५ अन्वये ९ मीटरचा रस्ता आखणे बाबत.)

**विषय क्रं. ७९**

मा. श्रीकांत पाटील व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि.१६/६/२००७ चे पत्र.

बोपोडी येथील मुंबई - पुणे रोड वाहतुकीस फार अडथळा वारंवार होत असतो. त्यामुळे तेथे उड्डान पूल करण्यासाठी १८.०० मी. रुंदीचा जोडणारा पूल बांधण्यात यावा.

**विषय क्रं. ८०**

नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये करण्यात आलेल्या बदलांनुसार प्रादेशिक आराखडयात बदल करणेकामी एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २० अन्वये प्रक्रिया सुरू करणेबाबत मा.उज्वल केसकर व मा.दत्ता खाडे यांचे दि.१८/४/०७ चे पत्रावर झालेला.मा.शहर सुधारणा ठराव क्रं. १४ दि.९/५/०७ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जाक्र.मआ/नअ/१७७,दि.१३/६/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ८१**

सहाय्यक अभियंता (सि) या पदाचे वेतन श्रेणीबाबत.मा.महादेव बाबर व मा.तानाजी लोणकर यांचे दि.४/४/०७ चे पत्रावर झालेला.मा.शहर सुधारणा ठराव क्रं. ७ दि.२०/४/०७बाबत अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जाक्र.मआ/सआ/से/१७९,दिनांक १४/६/ ०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**नगरसचिव ,**
**पुणे महानगरपालिका**

# पुणे महानगरपालिका
## शहर सुधारणा समिती
## कार्यपत्रिका क्रं. -१२

**शहर सुधारणा समितीची साप्ताहिक सभा शुक्रवार दि.२९/६/२००७ रोजी दुपारी ३:१५ (तीन पंधरा) वाजता समितीच्या सभागृहात भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्रं.८३**

मा.सुनिल बिबवे व मा. मोहनसिंग राजपाल यांचे दि.१९/६/०७ चे पत्र.

बिबवेवाडी कोंढवा रोडवरील स.नं.५७८ आनंदनगर वसाहत गेली वीस वर्षापासून सदर ठिकाणी अनेक मुलभूत सूविधापासून वंचित आहे.तरी स.नं.५७८ आनंदनगर वसाहत सन १९९५ पासून आहे.सदर वसाहत घोषित करण्यात यावी.

**विषय क्रं.८४**

मा.सौ. रेखा टिंगरे व मा.सौ.विद्या भोकरे यांचे दि.२०/६/०७ चे पत्र.

वॉर्ड क्रं. १ धानोरी येथील स.नं. ६७ मधील ओपन स्पेस हा पुणे महानगरपालिकेच्या मालकीचा असून त्याठिकाणी ५० लाख लिटर टाकी व संपवेल बांधण्यात यावी.

**विषय क्रं.८५**

मा.संजय नांदे व मा.शैलेंद्र नलावडे यांचे दि.२२/६/०७ चे पत्र.

धनकवडी सर्वे नं. ७ व ८ यांना जोडणारा दक्षिण - उत्तर रस्ता व सद्य वापरातील रस्ता नागरिकांसाठी २०५ कलम नुसार आखण्यात यावा.

**विषय क्रं.८६**

मा.राजेंद्र वागसकर व मा.डॉ.सिध्दर्थ धेंडे यांचे दि.२२/६/०७ चे पत्र.

शहर सुधारणा समिती ठराव क्रं. ८२,दि.२२/६/०७ चा फेरविचार करण्यात यावा.तो पर्यन्त मा.नगरसचिव यांनी सदर ठरावाची कार्यवाही करू नये .

(पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट क्रं. ९ अ (पै) येथील एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम ९१ अन्वये क्षेत्र दुरूस्ती करणेबाबत.)

**विषय क्रं.८७**

मा.विशाल तांबे व मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि.२२/६/०७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या मौजे धनकवडी नविन हद्यीमध्ये कोठेही गार्डनचे आरक्षण नाही. सदरचा भाग हा अत्यंत दाट लोकवस्तीचा असल्याने तेथे (जशिप डरलिश) असणे गरजेचे आहे. सदर ठिकाणी स.नं.२९ धनकवडी येथे अंदाजे ८००० चौ.मी.चा पट्टा मोकळा आहे. त्याचा वापर सध्या तेथील लहान मुले खेळण्यासाठी वापरतात. तसेच जागेवर कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम नाहीत.

यापूर्वी तेथे मा.जिल्हाधिकारी यांनी लेआऊट मंजुर केला होता. या लेआऊट नुसार सदर ठिकाणी बांधकामे झालेली आहेत.त्या लेआऊट मधील मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ अंदाजे ८००० चौ.मी.आहे.

सदर ठिकाणी निवासी झोन असल्याने बांधकाम परवानगी दिली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.तरी सदर ठिकाणी कोणतीही बांधकाम परवानगी देण्यात येऊ नये.

तरी स.नं.२९ चैतन्यनगर, धनकवडी येथील या लेआऊट मधील ८००० चौ.मी.जागेवर गार्डनचे आरक्षण टाकण्यात यावे. यामुळे तेथील स्थानिक वयोवृध्द, लहान मुले व महिला नागरिकांची सोय होईल.

**विषय क्रं.८८**

पुणे पेठ धनकवडी स.नं.४ मधील पूर्व - पश्चिम ६० फुट डी.पी. रस्त्याची पुर्न आखणी करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्रं. मआ/नअ/१९५,दि.२०/६/०७ चे विषयपत्र

**<u>विषय क्रं.८९</u>**

पुणे मनपाच्या अग्नीशामक दलाकडे '' ॲब्युलन्स अटेन्डंट '' (एकवट वेतन दरमहा प्रथम वर्ष रु.२८००/- व्दितीय वर्ष ३३००/- तृतीय वर्ष रु.३८०० /- व तीन वर्षाचे समाधानकारक सेवेनंतर समय वेतन श्रेणी रु.२८८० ते ५७८०+मान्य भत्ते) या पदावरील नेमणूकीबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज)यांचे क्रं. मआ-सहमआ-नअसे-१७१,दि.८/६/०७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ९०</u>**

नो पार्किंग झोन मध्ये उभी केलेल्या वाहनांवर कारवाई करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-वानि-१५५,दि.२९/५/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ९१</u>**

पुणे महानगरपालिका हद्दीतून जाणऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ते पुणे महानगरपालिकेना हस्तांतरित करणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-वानि-१५६,दि.२९/५/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ९२</u>**

पुणे मनपा कडून विविध कारणांमुळे जागा संपादन करताना देण्यांत आलेल्या टी.डी.आर.बाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रं.मआ-नअ-१६३,दि.१/६/२००७ चे पत्र.

**<u>विषय क्रं. ९३</u>**

नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विक ास आराखड्यामध्ये करण्यात आलेल्या बदलांनुसार प्रादेशिक आराखडयात बदल करणेकामी एमआरटीपी ॲक्ट १९६६ चे कलम २० अन्वये प्रक्रिया सुरू करणेबाबत मा.उज्वल केसकर व मा.दत्ता खाडे यांचे दि.१८/४/०७ चे पत्रावर झालेला.मा.शहर सुधारणा ठराव क्रं. १४ दि.९/५/०७ ला अनुसरून मा.महा.आयुक्त यांनी जाक्र.मआ/नअ/१७७,दि.१३/६/०७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप :- विषय क्रं. ८८ ते विषय क्रं.९३ चा विचार पुढील सभेत करावा असे मागिल सभेत ठरले.)

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**